# “समयाच्या समक्ष”चा परिचय

१४ जानेवारी, २०२५

आत्मीय वाचकांनो,

शुभ मकर संक्रांत. नववर्ष २०२५साठी हार्दिक शुभेच्छा!

नवीन आरंभाच्या या समयी तुम्हा सर्वांशी संवाद साधणे ही एक अद्‌भुत गोष्ट आहे. आणि मला वाटते की, एकाच विचारांच्या, एकच आवड असलेल्या लोकांशी संपर्क साधण्याची वेळ ही *नेहमीच* योग्य वेळ असते.

१ जानेवारी म्हणजे नववर्षाच्या दिवसाचे सिद्धयोग मार्गावर विशेष महत्त्व आहे. या दिवशी आपण सर्वजण सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये एकमेकांच्या सहवासात होतो. आपण नववर्षाचे स्वागत त्या पद्धतीने केले जी आपल्याला सर्वात जास्त आवडते, जिचे आपण या मार्गावर सर्वाधिक रसास्वादन करतो. आपण आपल्या श्रीगुरू, गुरुमाई चिद्विलासानंद यांच्यासमवेत ‘मधुर सरप्राइझ्’मध्ये भाग घेतला.

मला माहीत आहे की, मी जेव्हा या नववर्ष संदेशासाठी श्रीगुरुमाईंप्रति कृतज्ञता व्यक्त करते आहे, तेव्हा असे मी सर्व सिद्धयोगींच्या वतीने करते आहे. या संदेशामध्ये एक लय आहे, हा संदेश एका सूत्रासमान आहे—*खूप काही* निहित आहे यामध्ये! याविषयी तुम्ही माझ्याशी सहमत आहात ना? एकीकडे, या संदेशाच्या मध्यवर्ती विषयाशी—वेळ अर्थात् समयाशी—आपण अतिशय सखोलतेने परिचित आहोत. आपला जन्म होताच आपल्याला समयाशी लढण्यासाठी भाग पाडले जाते. समयाशी आपले एक नाते जुळते आणि आपल्याला पसंत असो वा नसो, आपण आयुष्यभर या नात्यात राहतो. तरीदेखील, तुम्ही जाणता व मी जाणते आणि आपण *सर्वजण* जाणतो की, समयाविषयी असे काहीतरी आहे, जे गूढ, आपल्या आवाक्यात न येणारे आणि पूर्णपणे आव्हानात्मक राहतेच. आपण कितीही वयस्क असलो किंवा युवा असलो, तरी आपण सदैव समयाशी झुंजत आहोत, सदैव समयाला समजून घेण्याचा प्रयत्न करत आहोत, सदैव हे समजून घेण्याचा प्रयत्न करत आहोत की, कशा प्रकारे सर्वाधिक कल्याणकारी रूपात आपल्यामध्ये आणि समयामध्ये परस्पर देवाणघेवाण होईल, परस्पर प्रभावाचे नाते स्थापित होईल. ही गोष्ट आपल्याला त्याच चिरकालीन प्रश्नाकडे घेऊन येते : समय काय *आहे* ?

या वर्षी, २ जानेवारीला गुरुमाई श्री मुक्तानंद आश्रमात सेवा करण्यासाठी आलेली लहान मुले, युवावर्ग आणि त्यांचे आईवडील यांच्यासमवेत सत्संग करत होत्या. त्या सत्संगादरम्यान, एका अकरा वर्षाच्या मुलाच्या पालकांनी सांगितले की, गेले काही महिने त्यांचा मुलगा समय या विषयात विशेष रुची घेऊ लागला आहे. अनेक दिवस, रात्री झोपण्याआधी तो त्याच्या आईवडलांना समयाविषयी विचारत असे आणि समयाविषयी त्याचे स्वतःचे विचार आणि धारणा व्यक्त करत असे. आपल्या मुलाच्या या वाढत्या रुचीला पाठबळ देण्यासाठी त्याच्या वडलांनी समय आणि शाश्वतता या विषयांवर त्याच्यासह माहितीपट [डॉक्यूमेंटरी फिल्म्स्] पाहण्यास सुरुवात केली.

हे स्पष्टच आहे की, जसे या मुलाला त्याच्या अंतरी सहजच ज्ञात झाले, तसे समयाविषयी शोध घेण्यासाठी आणि समजण्यासाठी *बरेच काही* आहे. आणि आपण सद्यस्थितीत ज्या सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात आहोत, ते पाहता मी श्रीगुरुमाईंप्रति अतिशय कृतज्ञता अनुभवते की, त्यांनी *या* समयी *हा* संदेश प्रदान केला आहे. जग अस्थिरसे, अनिश्चितसे प्रतीत होते. आपण पाहतो की, ज्या संरचनेवर आपण आपले जीवन, आपला समाज आणि आपले देश उभारले आहेत, आज ती तितकीशी ठोस आणि मजबूत राहिलेली नाही, जितकी एकेकाळी आपण समजत होतो. कोणत्याही गोष्टीविषयी खात्रीशीरपणे सांगता येणे अतिशय कठीण झाले आहे. आपले वास्तव जवळपास रोजच्या रोज बदलते आहे.

तथापि, या सगळ्या गोष्टींच्या दरम्यान, वर्ष २०२५साठी श्रीगुरुमाईंचा संदेश आपल्याला आपल्या क्षमतेचे, आपल्या सामर्थ्याचे स्मरण करवून देतो. श्रीगुरुमाई त्यांच्या संदेशात [इंग्रजीमध्ये] "तुमचा वेळ" या शब्दांचा प्रयोग एकदा नव्हे तर *दोनदा* करतात. जरी आपला सामना अस्थिर वाटणाऱ्या त्या गोष्टींशी झाला ज्यांच्याशी आपण आधीपासूनच परिचित आहोत, आपल्याला जरी असे वाटत असले की, गोष्टींवरून आपले नियंत्रण व्यापकतेने हरवत चालले आहे आणि अशा परिस्थितीला आपल्याला सामोरे जाणे भाग आहे, तरीदेखील, आपण आपल्या वेळेच्या बाबतीत काय करावे याची निवड करणे पूर्णतः आपल्या हातात आहे.

असे सांगितल्यावरही, आणि समयाच्या कदाचित अतिशय त्रासदायक स्वभावाचा विचार केल्यावरही, माझ्यापाशी तुम्हाला सांगण्यासाठी एक बातमी नक्कीच आहे जिच्यामुळे माझे हृदय *अत्यधिक आनंदाने* भरून जाते. हे संपूर्ण वर्ष, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर आपल्याला श्रीगुरुमाईंकडून या वर्षाच्या त्यांच्या संदेशावर शिकवणी प्राप्त होत राहतील.

गुरुमाईंनी सांगितले आहे की, प्रत्येक शिकवण ही तुमचा स्वतःचा वैयक्तिक मंत्र आहे असे तुम्ही समजू शकता, जो तुम्ही सहजपणे आठवू शकता आणि तुमचे दैनिक कार्य करत असताना तो आचरणात आणण्याच्या पद्धती शोधू शकता. मला खात्री आहे की, या शिकवणी ह्या वर्षी आपल्या

सिद्धयोग साधनेसाठी अतिशय साहाय्यक ठरतील—त्यांच्यामुळे तुम्हाला चिंतनमनन करण्यासाठी, त्यांचे अर्थ समजण्यासाठी व त्यांचे परिपालन करण्यासाठी अनेक संधी प्राप्त होतील. मला माहीत आहे की, तुमच्यापैकी अनेक लोक गुरुमाईंच्या संदेशाचा अभ्यास कसा करावा यावर आधीपासूनच विचार करत असतील. अलीकडेच एका व्यक्तीने सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर लिहून पाठवले :

> "गुरुमाईंचा संदेश ऐकल्यानंतर माझ्या मनात हे आले की, मी वेळेचा सन्मान करण्याचा अभ्यास करायला हवा. मी वेळेचा आदर करायला हवा. मला वेळेप्रति प्रशंसेचा व कृतज्ञतेचा भाव ठेवायला हवा, त्याची कदर करायला हवी. वेळ हा माझ्या जीवनासाठी अत्यावश्यक आहे. माझ्या हृदयात एक गहन चिंतन उदित होते आहे की, हा संदेश आचरणात आणण्यासाठी मला कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे, कसे आणि कुठे मी याचे परिपालन करायला हवे."

हा तर आपल्याला एकामागोमाग एक मिळणारा प्रसादच आहे—प्रथम आपल्याला गुरुमाईंचा संदेश प्राप्त झाला आणि आता गुरुमाईंच्या या शिकवणी, ज्या आपल्याला गुरुमाईंच्या संदेशाचे अन्वेषण करण्यामध्ये मार्गदर्शन करतील. मला वाटते की, मला आश्चर्यकारकपणे विपुल आशीर्वाद मिळाले आहेत, असे वाटते की, मी अतिशय भाग्यवान आहे. आपल्या शिष्यांप्रति आणि या मार्गावर नव्याने आलेल्या साधकांप्रति गुरुमाईंना किती प्रेम आहे, या गोष्टीने मी भारावून गेले आहे.

मला असेही वाटते की, या सद्भाग्याबरोबरच उत्तरदायित्वाचा भावदेखील येतो. हेच गुरू-शिष्य संबंधाचे मर्म आहे, होय ना? श्रीगुरू त्यांच्या शिकवणी प्रदान करतात आणि शिष्य म्हणून आपले हे उत्तरदायित्व आहे की, आपण त्या शिकवणी आचरणात आणाव्यात—आपण त्यांचे अन्वेषण करावे, त्यांचा अर्थ समजून घ्यावा आणि आपल्या जीवनाच्या संदर्भात त्या कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करावा. सरतेशेवटी, आपण जेव्हा श्रीगुरूंच्या शिकवणींशी संवाद स्थापित करतो, जेव्हा आपण त्या शिकवणींसमवेत एकरूप होतो, तेव्हाच त्या शिकवणी आपले वास्तव बनतात, तेव्हाच आपण त्यांच्यात निहित असलेल्या रूपांतरणकारी शक्तीची अनुभूती करतो आणि आपल्या शक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी तितकेच सक्षम होत जातो.

आणि आता—वेळ झाली आहे की, मी समापन करावे.

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.